# डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे आर्थिक व सामाजिक लेखन

**प्रा. डॉ. टी. ए. मोरे**

*जिजामाता शिक्षण संस्थेचे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, नंदुरबार*

**प्रस्तावना :-**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर अत्यंत तळमळीचे व हाडाचे सच्चे पत्रकार, संशोधक, चिकित्सक, व्यासंगी, संपादक अशा समाजामधून पत्रकारीतेचे खरेखुरे आद्य शिल्पकार व तळागाळातल्या सर्वसामान्य घटकांतील सर्व सोयी-सुविधा व मुलभूत हक्कांपासून वंचित असलेल्या दुर्लक्षित समाजाचे स्पंधन त्यांच्या ज्वलंत प्रश्नांना वाचा फोडून लेखनरूपी सामर्थ्याचा जोराचा घाव घालून सत्यमंथन संपादन करणारे भारतीय वृत्तपत्र सृष्टीतील एकमेव पत्रकार म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर होत. तत्कालिन परंपरावादी व वर्णवादी व्यवस्थेवर हल्ला करणारे एकमेव संपादक म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर. ज्यांनी आपल्या उभ्या संघर्षमय आयुष्यात मुलुख मैदानी तोफेचा समाभिमुख संघर्ष करून प्रस्थापितांच्या बालेकिल्ल्यांना सुरुंग लावणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर आद्य मिडिया कप्तान होत. त्यामुळेच बहुजनांच्या लेख-ा प्रवासाला वाट मोकळी झाली. म्हणूनच आजही बहुजनांची वृत्तपत्रे शासन व प्रशासनाच्या विरोधात लिखाण करू लागली. त्याचे मुळ कारण डॉ. बाबासाहेबांच्या समाजाभिमुख पत्रकारीतेत दडले आहे. डॉ. बाबासाहेबांची पत्रकारीता ही खडतर व खडकाळ कर्मठ लोकसमुहाच्या प्रतिकाराला प्रतिउत्तर देणारी होती. डॉ. बाबासाहेबांनी समता, जनता, मुकनायक, प्रबुद्ध भारत, बहिष्कृत भारत इ. वृत्तपत्ररूपी धारदार हत्यारांचा वापर समाजमन घडविण्यासाठी केले. समाज प्रबोधन व समाजहित हेच अंतिम व प्रथम ध्येय बाळगुन प्रसिद्धी माध्यमांच्या गर्दीत त्यांनी वेगळेपण कायम राखले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी झुंजारपणे, बाणेदारपणे लेखणी चालवून तत्कालिन व्यवस्थेचा जाहिर पंचनामा केला व सत्य असल्याची कारणमिमांसा जगासमोर मांडली. समाजाभिमुख प्रश्नांना प्रथम प्राधान्य या तत्वा-ने सर्वसामान्यांचा आवाज बुलंद केला. सर्वसामान्यांच्या मुलभूत प्रश्नांना प्रथम प्राधान्य देण्याचे कार्य सर्वप्रथम डॉ. बाबासाहेबांना आजच्या धंदेवाईक किंवा व्यवसायाभिमुख पत्रकारीता नकोच होती. त्यांनी फक्त समाजकल्याण होईल यासाठीच प्रेस सुरु केली. १९२० मध्ये मुकनायक, १९२७ मध्ये बहिष्कृत भारत, १९२८ मध्ये समता, १९२९ मध्ये जनता व १९५६ मध्ये प्रबुद्ध भारत ही पाक्षिके काढलीत. त्यांनी कधीच तडजोड केली नाही किंवा तोडीपानी केली नाही. पूर्ण वेळ समाजाभिमुख पत्रकारीतेचे प्रमुख म्हणून डॉ. बाबासाहेबांची दखल तत्कालिन ब्रिटीश मिडीयाने सुद्धा घेतली होती. भारतीय प्रसार माध्यमांनी आता तरी आपला कावेबाजपणा सोडावा कारण बहुतांश वृत्तपत्रांनी समाजाभिमुख चेहरा झाडु-ा सुधारजावादी बुरजा घातला आहे. पर्यायाने कमीतकमी समाजहित व जास्तीतजास्त व्यावसायिक बातम्यांच्या उदात्तीकरणाने वृत्तपत्रांचा चेहरा काळवंडला आहे. चॅनेलच्या रियालिटी शोच्या महाजंजाळात समस्या संपल्या आहेत, असेच अप्रत्यक्ष घोषित केल्यासारजे जाणवते. एकंदर वर्तमान परिस्थितीत समाजाचा रक्षणकर्ता व समाजाचा वालीच राहिला नाही. लोकशाहीचा चौथा स्तंभ जर अशा दोलायमान परिस्थितीतून जात असेल

तर डॉ. बाबासाहेबांच्या समाजाभिमुख पत्रकारीतेच्या संघर्षाची मशाल कायमच धगधगती ठेवली.

**उद्देश :-**

१) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे पत्रकारीतेचे योगदान जाणून घेणे.

२) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे पत्रकारीतेच्या विचारासंबंधी अध्ययन ज़रजे.

३) आजची पत्रकारीतेची भूमिका स्पष्ट करणे.

**संशोधन पद्धती -**

सदर शोध निबंध दुय्यम सामग्रीवर आधारीत असून या शोध निबंधासाठी ग्रंथ, मासिके व वर्तमानपत्रांचा उपयोग करण्यात आलेला आहे.

आज पत्रकारीतेचे क्षेत्र जीवघेणे जाहिरातीच्या गळेकापू स्पर्धेत व दुषित पक्षिय राजकारण्यांच्या अंकित होऊन भरकटलेले आहे. परंतु खऱ्या अर्थाने मुक्यांचा आवाज बुलंद करणारी डॉ. बाबासाहेब आंबेडज़रांचे मुकनायक पत्रकारीता आज दिसत नाही व आजची पत्रकारीता कोठे आहे? बाबासाहेबांच्या पत्रकारीतेच्या तुलनेत आजची पत्रकारीता मरगळलेली दिसते. आजची पत्रकारीता व्यवसायाभिमुख झालेली दिसते. बहुजनवादी वृत्तपत्रांना आपल्या उत्पन्नातील काही टक्के रक्कम समाजऋण परतफेड म्हणून दिली पाहिजे तरच खऱ्या अर्थाने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना आदरांजली दिल्यासारखे होईल. तेव्हा बहुजनांनी आत्मपरीक्षण करण्याची गरज आहे. पत्रकारीतेच्या क्षेत्रात आदर्श मुल्य व संविधानीक मुल्य वेशीवर टांगुन पत्रकारीता करणाऱ्या संपादकांना बाबासाहेब म्हणतात, "नैतिकता हाच वृत्तपत्राचा कणा असावा." असे सांगुन ते पुढे म्हणतात, "वृत्तपत्राचे जाळे आणि सक्रिय कार्यकर्त्यांचे जाळे हेच समाजाभिमुख पत्रकारीतेचे रहस्य आहे." बाबासाहेबांनी समाजाभिमुख आणि डोळस पत्रकारीतेला न्याय द्या असे आवाहन करून पत्रकारीतेला एक नवा मापदंड दिला. आजही जो दिपस्तंभाप्रमाणे उभा आहे तो प्रकाश दाखवितो.

तत्कालिन समाज मुका होता. अनंत काळापासून अन्याय, अत्याचाराने पिडीत होता. या समाजाच्या पायाखाली जमीन तर नव्हतीच, आकाशही त्यांचे नव्हते. अशा समाजाला बोलके करण्याचे काम डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केली. त्यांच्या मनात वृत्तपत्र सुधारण्याचे काम त्यांच्याच शिरी होते. त्यामुळे वृत्तपत्र सुरु करण्यात ते समाजाला बोलते करणे हा त्यांचा क्रांतीकार्याचा पहिला उद्देश होता. ज्यांना संपूर्ण समाजच बदलुन टाकायचा होता व त्यासाठी त्यांनी वृत्तपत्र सुरु केले. वृत्तपत्राच्या माध्यमातून त्यांनी संपूर्ज समाजातच परिवर्तन घडवून आणल्याचे दिसून येते. त्यांचा पत्रकारीतेचा उद्देश कोणता होता. ते मुकनायक - ज्या समाजाला धर्म, संस्कृती, जात आणि व्यवस्थेने मुका केलेला आहे. निमुटपणे अन्याय सहन करणाऱ्या मुक्यांचा नायक होण्याचे कार्य त्यांनी हाती घेतले होते. बहिष्कृत भारत - जो समाज बहिष्कृत आहे. आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिकदृष्ट्या मागासलेला आहे. त्यांना शिक्षणाची वाट दाखविली. समता - या पाक्षिकातून समाजात समता आणण्याचा उद्देश स्पष्ट होतो. त्यानंतर जनता - ज़ुलामाला त्यांच्या गुलामीची जाणिव करून द्या. म्हणजे ते बंड करून उठतील. या आशयाचा संदेश दिलेला होता. मुज़-ायज़ - स्वराज्याची सर सुराज्याला नाही, ते स्वराज्य नव्हे, हे तर आमच्यावर राज्य. अशा लिखाणाने मुज़-ायज़ाने जनमानसात स्थान निर्माण केले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्थापन केलेल्या वृत्तपत्रांची कारकिर्द त्यांच्या वयाच्या जवळपास अर्ध्या आयुष्याची ठरते. त्यांच्या जीवनातील ३२-३३ वर्षांचा काळ शिक्षणासाठी गेलेला होता. त्यानंतर त्यांनी नियतकालिके व वृत्तपत्रे स्थापन करून ती चालविण्यासाठी संपूर्ण आयुष्य लोकजागृती, बहुजन समाजाचे कल्याण करण्यासाठी वृत्तपत्रात घालविलेला होता. प्रथम शिक्षणाला महत्त्व दिल्यानंतर वृत्तपत्रांना अग्रक्रम देऊन बहुजन समाजासाठी समाजाभिमुख कार्य करण्यातच वेळ दिलेला होता. जनतेच्या वाचकांसाठी जी पत्रे लिहिली त्यातून त्यांच्या वैविध्यपूर्ण लेखनाचे स्वरूप लक्षात येते. बाबासाहेबांनी पत्रकारीतेत विविध विषय, प्रश्न हाताळलेले दिसून येतात. त्यात शेतमजूर, शेतकरी, कामगार, मुले, स्त्रियांचे प्रश्न, देवदासींच्या समस्या हे प्रश्न जसे दृष्टीस पडतात तसेच लोकांच्या सामाजिक प्रश्नांबरोबर राजकीय प्रश्न व राजकीय घडामोडींचे दर्शनही त्यांच्या वृत्तपत्रिकेतून दिसून येते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे वृत्तपत्र क्षेत्रामध्ये विरोधक भरपूर होते. त्यांच्या चळवळीवर, त्यांच्या मानव मुक्तीच्या कार्यावर, वृत्तपत्रातील लेखांवर विरोधकांची सूक्ष्म नजर राहत होती. अशा टिकाकारांना योग्य उत्तर देऊन ते निरूत्तर करीत असत.

डॉ. बाबासाहेबांच्या लेखणीला तलवारीची धार होती. त्यामुळेच ते सत्य मांडतांना, समाजाला न्याय मिळवून देतांना कधीही डगमगले नाही. लोकांमध्ये जागृती घडविण्याचे महान कार्य केले. आजच्या आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगासारखी आंबेडकरी पत्रकारीता नव्हती. गावागावात, खेड्यापाड्यात डॉ. बाबासाहेबांच्या वृत्तपत्रांचे वाचन केले जात होते. वृत्तपत्रातील बातम्या, लेखांवर चर्चा घडून येत असत व त्या चर्चेतून प्राप्त झालेल्या ज्ञानातून समाज, वाचक, जनता जागृत होत होती. लढण्यास सज्ज होत होती. डॉ. बाबासाहेबांच्या पत्रकारीतेतून आजही असंख्य धडे शिकावयास मिळतात. परंतु त्यांच्या पत्रकारीतेकडे दुर्लक्ष झाल्याची खंत सतत जाणवत असते.

**संदर्भ -**

१) जेळकर न.चि. - वृत्तपत्र मिमांसा
२) जानडे रा.गो. - मराठी वृत्तपत्रांचा इतिहास
३) जरात शंकरराव - डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची पत्रे
४) हिवराळे सुजराम - लोकपत्रकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर
५) दै. सम्राट - ११ व २१ मे २०१२